नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २३५ Issue - 235 | वार बुधवार दि. १४ जानेवारी २०२६ Blow- Wednesday Date 14 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांची तारीख अखेर जाहीर



## ५ फेब्रुवारी रोजी मतदान; ७ फेब्रुवारीला होणार मतमोजणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात मागील काही महिन्यांपासून ज्या निवडणुकांची प्रतीक्षा होती त्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकांची अखेर आज घोषणा करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत या निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याची घोषणा केली आहे. पुणे जिल्ह्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधदुर्ग, परभणी, धाराशिव आणि लातूर या जिल्हा परिषदांच्या निवडणुका आणि त्या अंतर्गत असणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पहिल्या टप्प्यात होणार आहे. यासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आल्याने आजपासून सदर जिल्ह्यांमध्ये आचारसंहिता लागली आहे. या निवडणुकीसाठी मतदान ५ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे. तसंच मजमोजणी दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेपासून करण्यात येणार आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी १६ जानेवारी ते २१ जानेवारी या कालावधीत अर्ज दाखल करता येणार आहेत. त्यानंतर अर्जांची छाननी २२ जानेवारी रोजी होईल आणि उमेदवारी माघारीची अंतिम तारीख २७ जानेवारी असणार आहे. अंतिम उमेदवारांची यादी आणि चिन्ह वाटप- २७ जानेवारी दुपारी साडेतीन वाजेनंतर होईल.

दरम्यान, ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या इतर २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका नंतर घेण्यात येणार आहेत.

राज्यातील ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असलेल्या पुणेजिल्हा परिषदेसह १२ जिल्हा परिषदा आणि त्या जिल्ह्यांतील पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीची तयारी करा, अशा शब्दांत राज्य निवडणूक आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना नुकतेच पत्र पाठवून आदेश दिला होता. जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्य निवडणूक आयुक्तांच्या पत्रकार परिषदेतील ठळक मुद्दे:

- दुबार मतदार आम्ही निश्चित केले असून त्याबाबतची कार्यवाही अधिकारी करतील. - मताधिकार मोबाईलॲपद्वारे मतदाराला त्याला त्याचा निवडणूक विभाग, मतदान केंद्र शोधता येईल - मतदाराला आयोगाच्या वेबसाईटवरही त्याचं नाव टाकून त्याचे मतदान केंद्र शोधता येईल
- ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गरोदर आणि तान्ह्या बाळासह असणाऱ्या स्त्रियांना मतदानावेळी प्राधान्य देण्यात येईल - १२ जिल्हा परिषदांमधून ७३१ सदस्य निवडून दिले जातील
- १२५ पंचायत समित्यांमधून १ हजार ४६२ सदस्य निवडून दिले जातील राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकाअंतिम टप्प्यात आल्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका कधी लागणार याची उत्सुकता इच्छुक उमेदवारांसह राजकीय पक्षांना होती. दरम्यान, निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारीपर्यंत मुदत दिली होती. दरम्यान, राज्यातील २० जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण असून त्यावर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यावर येत्या २१ जानेवारीला सुनावणी होणार आहे. दरम्यान, ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यासाठी आयोगाने मुदतवाढ मागितली होती. त्यावर येत्या १५ फेब्रुवारीपर्यंत निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने काल दिले. त्यानंतर आज ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असणारे १२ जिल्हे असून त्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकींची अखेर आज घोषणा करण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, परभणी, धाराशिव आणि लातूर या जिल्हा परिषदांच्या निवडणुका आणि त्या अंतर्गत असणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पहिल्या टप्प्यात होणार आहे. जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी तसेच तहसिलदारांची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. जिल्हा परिषदा तसेच पंचायत समित्यांच्या निवडणुका या निर्भय, मुक्त तसेच पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची सर्व जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. तसेच पर्यवेक्षक अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांवर जबाबदारी देण्यात आली आहे.

# अजित पवारांनी हा शब्द पाळला नाही, फडणवीस नाराज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट आणि शरद पवार गट) हातमिळवणी केल्याने राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. या संभाव्य एकत्रीकरणावर राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या खास शैलीत मिश्किल टिप्पणी केली आहे. कब बाप मरेगा और कब बैल बटेंगे, या हिंदी म्हणीचा संदर्भ देत त्यांनी या चर्चांना सध्या तरी फारसे महत्त्व देण्याची गरज नसल्याचे सूचित केले.

देवेंद्र फडणवीस यांनी आज प्रचारसभा संपल्यानंतर माध्यमांना प्रतिक्रिया दिली. पुणे शहराने नेहमीच भारतीय जनता पक्षाला साथ दिली आहे. त्यामुळेच आम्ही आमच्या प्रचारसभांची सुरुवात आणि सांगता पुण्यातून करतो. केवळ पुणेच नव्हे, तर मुंबई, नाशिक आणि नागपूरसारख्या मोठ्या शहरांमधील मतदारांनी भाजपलाच मतदान करण्याचा ठाम निश्चय केला आहे. विरोधकांनी कितीही प्रयत्न केले तरी लोकांची ही मानसिकता



बदलणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये महायुती होणार नाही, हे मी आधीच स्पष्ट केले होते, असे फडणवीस यांनी सांगितले. मी शब्द पाळणारा माणूस आहे. आम्ही मैत्रीपूर्ण लढत देऊ आणि एकमेकांवर वैयक्तिक टीका करणार नाही, असे ठरले होते. मात्र, अजित पवारांनी हा शब्द पाळला नाही, अशा शब्दांत त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली. तरीही, निवडणुकीनंतर स्थानिक पातळीवर गरज पडल्यास विरोधकांना सोबत घेण्याबाबत विचार होऊ शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार असल्याच्या बातम्यांवर फडणवीस म्हणाले की, सध्या यावर बोलणे अकाली आहे. हिंदीत एक म्हण आहे- 'कब बाप मरेगा और कब बैल बटेंगे', तशीच काहीशी ही परिस्थिती आहे. अजून काही ठोस घडलेले नसताना एवढी चर्चा कशासाठी? त्यांनी पुढे स्पष्ट केले की, केवळ दोन महापालिकांमध्ये हे दोन्ही गट एकत्र लढत आहेत, परंतु राज्यातील इतर २७ महापालिकांमध्ये ते एकमेकांविरोधात उभे आहेत. त्यामुळे या 'एकत्रीकरणाला' फारसा अर्थ उरत नाही.

अजित पवारांच्या दिल्ली दौऱ्यांबाबत विचारले असता, फडणवीस यांनी मिश्किलपणे सांगितले की, जर ते आमच्या पक्षाच्या वरिष्ठांना भेटण्यासाठी दिल्लीला जात असतील, तर त्यात मला काहीच अडचण नाही. उलट, त्यांच्या प्रवासासाठी विमान आणि तिकिटाची व्यवस्थाही मी स्वतः आनंदाने करीन. जोपर्यंत ते आमच्या वरिष्ठांच्या संपर्कात आहेत, तोपर्यंत मी समाधानी आहे.

# तोपर्यंत बिनविरोध नगरसेवकांवर स्थगिती कायम ठेवावी; अविनाश जाधवांनी मुंबई हायकोर्टात दाखल केलेल्या याचिकेवर उद्या तातडीची सुनावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांच्या विरोधात मनसे नेते अविनाश जाधव यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. महापालिका निवडणुकीसाठी आज (१३ जानेवारी) प्रचाराचा शेवटचा दिवस आहे. दुसरीकडे, उद्या बिनविरोध संदर्भातील याचिकेवर तातडीची सुनावणी होणार आहे. मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठासमोर या याचिकेवर उद्या सुनावणी होणार आहे. या याचिकेच्या माध्यमातून जे नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत त्यांच्यावर स्थगिती देण्यात यावी आणि जोपर्यंत सुनावणी पूर्ण होत नाही तोपर्यंत स्थगिती कायम ठेवण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. अविनाश जाधव यांनी उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिके संदर्भात उद्या (१४ जानेवारी) सकाळीच सुनावणी होणार आहे. प्रचार संपल्यानंतर या सुनावणीमधून मुंबई उच्च न्यायालयाने मनसेचे म्हणणे मान्य केलं, तर सर्व बिनविरोध निवडून आलेल्या नगरसेवकांच्या निवडीवर स्थगिती येऊ शकते. दरम्यान, मनसेकडून दुबार मतदारांची यादी फोटोसहीत तयार असल्याचे अविनाश जाधव यांनी सांगितले. त्यामुळे मतदानाला असे मतदार आल्यानंतर त्यांची मनसेकडून चांगल्या प्रकारे स्वागत केलं जाईल, असा इशारा देखील अविनाश जाधव यांनी दिला.

निवडणुका बिनविरोध जिंकण्यात भाजपने आघाडी घेतली असून आतापर्यंत पक्षाचे ४४ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. त्याखालोखाल शिंदेंच्या शिवसेनेने दुसरा क्रमांक मिळवला असून त्यांचे २२ नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. कल्याण-डोंबिवली महापालिकेत भाजपचे सर्वाधिक १५ तर शिवसेनेचे ७ उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. याशिवाय अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचे २ उमेदवार, तर मालेगावमधून इस्लाम पार्टीचा १ आणि एका अपक्ष उमेदवाराचाही बिनविरोध विजय झाला आहे.

राज ठाकरे यांनी काल झालेल्या ठाण्यातून सभेतून बिनविरोध निवडीवरून हल्लाबोल केला होता. तसेच १ कोटीपासून १५ कोटीपर्यंत ऑफर झाल्याची धक्कादायक माहिती समोर आणली होती. राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्रामध्ये ६६ ठिकाणी पैसे देऊन पैसे वाटून फॉर्म माघारी घ्यायला लावले. मनसे उमेदवारांना दिलेल्या मोठ्या ऑफर्स सुद्धा त्यांनी सांगितल्या. ते म्हणाले, शैलेश धात्रक आणि त्यांच्या कुटुंबातील तीन लोकांना एका घरात मिळून १५ कोटी रुपयाची ऑफर दिली गेली. राजश्री नाईक यांना पाच कोटीची ऑफर झाली. सुशील आवटे यांना एक कोटी रुपयाची ऑफर झाली, पण नाकारले. या परिस्थितीवर भाष्य करताना ते म्हणाले, महाराष्ट्रभर पैसे वाटलेत, कोणाला पाच कोटी, कोणाला १० कोटी, कोणाला १५ कोटी, कोणाला एक कोटी दोन कोटी... ही कोणती महाराष्ट्राची निवडणूक आहे? अहो इतकी वर्ष निवडणुका आम्ही बघतोय, पण अशी निवडणूक नाही पाहिली.

भाविकांच्या उत्साहाला उधाण, आज होम प्रदीपन सोहळा होणार

संस्कारभारतीची तीन किलोमीटर रंगावली

# 'हर्र बोला हर्र बोला'च्या जयघोषात पार पडला अक्षता सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वरांच्या विवाह सोहळा अत्यंत उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी लाखो भाविकांनी शांतम शांतम, दिडम डिडम च्या गजरात अक्षता वाहिल्या.

सोलापूरच्या जगप्रसिद्ध श्री सिद्धरामेश्वर यांच्या यात्रेतील प्रमुख धार्मिक विधी मंगळवारी पार पडला. पहाटे सिध्देश्वरांच्या दंडाचे प्रतीक असलेल्या नंदीध्वजांचे सुगडी पूजन करण्यात आले. सकाळी ७.०० वाजता मल्लिकार्जुन मंदिराजवळील मानकरी श्री हिरेहब्बू यांच्या निवासस्थानातून सातही नंदी ध्वजांच्या मिरवणुकीला प्रारंभ झाला. सुमारे साडेतीन किलोमीटर अंतर पार करून सातही नंदीध्वज दुपारी साधारण साडेबाराच्या दरम्यान सिद्धेश्वर मंदिरा जवळील संमती कट्टा येथे आले. मिरवणुकीत प्रारंभी पंचरंगी झेंडा, त्यानंतर हिंदू धर्माचे प्रतीक असलेला भगवा झेंडा, दिवटगी व त्यानंतर सिद्धरामेश्वरांची पालखी अशा




क्रमाने रचना करण्यात आली होती. पालखीच्या दोन्ही बाजूंना अब्दागिरी झळकत होत्या.

मिरवणुकीच्या मार्गावर संस्कार भारती तर्फे संपूर्ण साडेतीन किलोमीटर अंतरापर्यंत रांगोळी काढण्यात आली होती. रांगोळी काढण्याच्या कामी संपूर्ण भारतभरातून सुमारे २०० कलाकार आले होते. संस्कार भारतीचे कार्यकर्ते रघुराज देशपांडे, अनंत देशपांडे, ममता अवस्थी, संगीता भांबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आलेली रांगोळी नजरेत भरत होती. रांगोळ्यांमध्ये गोपद्म, केंद्रवर्धिनी, शृंखला, सर्प रेषा आदी मंगल चिन्हे रेखली होती.

पालखीच्या अग्रभागी हिरेहब्बू बंधू उपस्थित होते. दुपारी साडेबारा दीडच्या सुमारास सातही नंदीध्वज संमती कट्ट्याजवळ आले.

श्री सिध्देश्य मंदिर परिसरातील संमत्ती कटानजीक विधिवत धार्मिक पध्दतीने व परंपरेनुसार साधारणता दुपारी १२.३०ता सोहळा संपन्न होईल. तत्पूर्वी परंपरेनुसार जागोजागी नंदीध्वनाची पारंपारिक पध्दतीने पूना होऊन दुपारी १२.३० वाजता श्री सिध्देश्वर मंदिर परिसरात येतील, तद्नंतर अक्षता सोहळ्यास प्रारंभहोईल अक्षता सोहळा नंतर पुनश्चः एकदा ६८ लिगांनी प्रदक्षिणा करण्यासाठी नंदीध्वज मार्गस्थ होतील व रात्री

१२:०० वाजेपर्यंत नंदीध्वज हिरेहब्बू मठातं परत येईल. या प्रकारे दुसऱ्या दिवसाचे ठरलेल्या कार्यक्रमानुसार नंदीध्वजांच्या व पालखीचे



मिरवणूका निघतील.

संस्कारभारती ची तीन किलोमीटर रंगावली

दि. १३ जानेवारी २०२६ रोजी अक्षता सोहळयाच्या दिवशी नंदीध्वजांच्या मिरवणूक मार्गावर संस्कारभारती चे संपूर्ण भारत देशातील १५० ते २०० रंगावली कलाकार आपली कला सादर करणार आहेत. रांगोळीच्या पायघड्या (पथरंगावली) घालणार आहेत. कसबा पेठेतील हिरेहब्बू मठापासून ते सिध्देश्वर मंदिरातील संमती कट्टा या रुटपर्यंत तीन किलोमीटरच्या मार्गावर रंगावलीची सुरेख पायघडी अंथरण्यात येणार आहे. संस्कारभारती चे कार्यकर्ते रघुराज देशपांडे, अनंत देशपांडे, ममता अवस्थी व संगिता भांबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे नेत्रदिपक कार्य कौशल्याने करणार असून रंगावलीमध्ये गोपद्म, केंद्रवधिनी, शृंखला, सर्परेषा आदी मंगलचिन्हे रेखली जातील. गेल्या सत्तावीस वर्षांपासून संस्कारभारती चे कार्यकर्ते अक्षता सोहळयाच्या दिवशी नियमित रंगावली घालत आहेत.

सर्व नंदी ध्वज संमती कट्टा परिसरात आल्यानंतर पुरोहितांनी संमती वाचन केले. त्यानंतर सर्व भाविकांनी सिद्धरामेश्वर यांच्या लग्ननिमित्त अक्षतांची उधळण केली. शेवटी शांतम शांतम, डिड्डम डिड्डम च्या गजरात सोहळाची पूर्तता करण्यात आली.

अक्षता सोहळा पार पडल्यानंतर परंपरेप्रमाणे सर्व नंदीध्वज पुन्हा एकदा ६८ लिंगांना प्रदर्शना करण्यासाठी मार्गस्थ झाले.

## संपादकीय....

### पहिल्या टप्पा

राज्यातील ५० टक्क्यांपेक्षा कमी आरक्षण असलेल्या पुणेजिल्हा परिषदेसह १२ जिल्हा परिषदा आणि त्या जिल्ह्यांतील पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीची तयारी करा, अशा शब्दांत राज्य निवडणूक आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना नुकतेच पत्र पाठवून आदेश दिला होता. जिल्हा परिषदेच्या निवडणुकांसाठी उपजिल्हाधिकाऱ्यांना निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्त करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यात मागील काही महिन्यांपासून ज्या निवडणुकांची प्रतीक्षा होती त्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकांची अखेर आज घोषणा करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत या निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याची घोषणा केली आहे. पुणे जिल्ह्यासह सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, परभणी, धाराशिव आणि लातूर या जिल्हा परिषदांच्या निवडणुका आणि त्या अंतर्गत असणाऱ्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पहिल्या टप्प्यात होणार आहे. यासाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आल्याने आजपासून सदर जिल्ह्यांमध्ये आचारसंहिता लागली आहे. या निवडणुकीसाठी मतदान ५ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत घेण्यात येणार आहे. तसंच मजमोजणी दिनांक ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजेपासून करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी १६ जानेवारी ते २१ जानेवारी या कालावधीत अर्ज दाखल करता येणार आहेत. दिलेल्या तारखांनुसार निवडणूक प्रक्रिया होणार आहे.

# तिळसंक्रांतः तिळगूळ, वाण आणि पतंग माणुसकीचा सण

भारतीय सणपरंपरेत काही सण हे केवळ धार्मिक विधीपुरते मर्यादित न राहता सामाजिक संवाद, नातेसंबंध आणि जीवनमूल्यांची आठवण करून देणारे असतात. मकरसंक्रांत हा असाच एक सण. ऋतूंच्या बदलाची, सूर्याच्या उत्तरायण प्रवासाची आणि माणसाच्या अंतर्मनात सकारात्मक ऊर्जेच्या प्रवेशाची ही सुरुवात असते. महाराष्ट्रात हा सण प्रामुख्याने 'तिळसंक्रांत' म्हणून ओळखला जातो. 'तिळगूळ घ्या, गोड गोड बोला' या साध्या वाक्यातून जीवनाचं मोठं तत्त्वज्ञान सांगणारा हा सण आजही सामाजिक सलोखा जपण्याचा संदेश देतो. मकरसंक्रांत म्हणजे सूर्य मकर राशीत प्रवेश करतो, उत्तरायणाची सुरुवात होते. कृषीप्रधान भारतासाठी हा क्षण अत्यंत महत्त्वाचा. थंडीचा कडाका ओसरू लागतो, दिवस मोठे होतात आणि शेतीला नव्या आशेची पालवी फुटते. शेतकऱ्याच्या आयुष्यातील कष्टाचा काळ मागे पडत, नव्या हंगामाची चाहूल लागते. त्यामुळेच हा सण केवळ पंचांगापुरता नसून, मातीशी जोडलेला आहे.

तिळसंक्रांतीचा आत्मा म्हणजे तिळगूळ. तीळ आणि गूळ दोन्हीही आरोग्यदायी, शरीराला उष्णता देणारे. थंडीच्या दिवसात शरीराला बळ देणारे. पण या खाद्यपदार्थामागे केवळ पोषणमूल्य नाही, तर सामाजिक संदेश आहे. तीळ काळे असले तरी गूळ त्यांना गोडवा देतो. माणसाच्या आयुष्यातील कटुता, मतभेद, गैरसमज हे तिळासारखे असतात; पण संवाद, प्रेम आणि आपुलकीचा गूळ त्यांना गोड बनवतो. तिळगूळ घ्या आणि गोड गोड बोला ही केवळ शुभेच्छा नाही, तर समाजातील ताणतणाव विसरून एकमेकांशी प्रेमाने वागण्याची विनंती आहे. आज सोशल मीडियाच्या काळात शब्द जखमा करतात, टीका वाढते; अशा वेळी तिळगुळाचा हा संदेश अधिकच समर्पक ठरतो.





– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

महाराष्ट्रात तिळसंक्रांतीला वाण देण्याची प्रथा विशेष महत्त्वाची आहे. गृहिणी एकत्र येतात, हळदी-कुंकू लावतात, वाण देतात. ही प्रथा केवळ धार्मिक नाही; ती स्त्री-सामाजिकतेची शक्ती दर्शवते. वाणामध्ये तीळ, गूळ, साखर, फुलं, भांडी, कापड यांचा समावेश असतो. काळानुसार स्वरूप बदलले; पण भाव कायम राहिला. घराघरांतील नाती घट्ट करणारा हा सण आहे. नव्या सूनबाईंना समाजात सामावून घेणारा, वृद्ध महिलांना मान देणारा आणि मैत्रीचा धागा घट्ट करणारा हा सोहळा आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात स्त्रियांना एकत्र येण्यासाठी वेळ कमी मिळतो. अशा वेळी तिळसंक्रांत ही संवादाची, अनुभवांची देवाणघेवाण घडवणारी पर्वणी ठरते.

उत्तर भारतात मकरसंक्रांत म्हणजे पतंगोत्सव. गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेशात आकाश रंगीबेरंगी पतंगांनी भरून जातं. पतंग उडवणं म्हणजे केवळ खेळ नाही; ते स्वातंत्र्याचं, स्पर्धेचं आणि आनंदाचं प्रतीक आहे. लहानग्यांपासून वृद्धांपर्यंत सर्वजण छतावर, मैदानावर एकत्र येतात. काय पो छे!चा जल्लोष, ढोल-ताशांचा गजर, संगीत, हास्य समाज एक क्षण तरी एकत्र येतो. तुटलेल्या नात्यांना जोडणारा हा सण आहे. मात्र आज पतंगोत्सवाबाबत पर्यावरणीय जाणीवही तितकीच महत्त्वाची ठरते. चायनीज मांजा, पक्ष्यांचे जीव, अपघात यामुळे आनंदाला जबाबदारीची किनार लागते. पर्यावरणपूरक पतंगोत्सव ही काळाची गरज आहे. तिळसंक्रांत हा सण जाती-धर्माच्या भिंती ओलांडतो. तिळगूळ देताना कुणाचा धर्म विचारला जात नाही, वाण देताना कुणाची जात पाहिली जात नाही. हा सण समानतेचा आहे. संतपरंपरेतही संक्रांतीचं महत्त्व दिसून येतं. संतांनी गोड बोलण्यावर, अहंकार टाकून देण्यावर भर दिला. आज समाजात द्वेष, ध्रुवीकरण वाढत असताना तिळसंक्रांत आपल्याला मानवतेचा धडा देतो. आज तिळगूळ व्हॉट्सपवरच्या शुभेच्छांपुरता मर्यादित होतोय, हळदी-कुंकू ऑनलाईन गिफ्ट्समध्ये बदलतंय, पतंग मोबाइल गेममध्ये अडकतोय. बदल अटळ आहे; पण भाव हरवता कामा नये. संक्रांत म्हणजे केवळ सण नाही, ती संवादाची संधी आहे. शेजाऱ्याशी बोलण्याची, नात्यांतली कटुता मिटवण्याची, जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधी.

तिळसंक्रांत आपल्याला शिकवते,

शब्द गोड ठेवा, मन स्वच्छ ठेवा आणि नाती घट्ट ठेवा. तिळगुळाचा गोडवा, वाणाची आपुलकी आणि पतंगांचा उन्मुक्त आनंद हे सगळं मिळून तिळसंक्रांत केवळ सण न राहता माणुसकीचा उत्सव बनतो. आज समाज तणावग्रस्त आहे, संवाद तुटतोय, मतभेद वाढत आहेत. अशा काळात तिळसंक्रांत अधिक अर्थपूर्ण ठरते. कारण हा सण सांगतो की, भांडणं विसरा, अहंकार सोडा, गोड गोड बोला आणि कदाचित याच साध्या तत्त्वज्ञानात आपल्या समाजाचं मोठं उत्तर दडलेलं आहे.

तिळगुळाचा गोडवा तुमच्या शब्दांतून, वाणाची उदारता तुमच्या कृतीतून आणि पतंगासारखी उंच भरारी तुमच्या स्वप्नांतून सदैव झळकत राहो. नव्या उत्तरायणात आयुष्य अधिक प्रकाशमान, नातेसंबंध अधिक मधुर आणि भविष्य अधिक आशादायी व्हावे, हीच मनापासून तिळसंक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा!

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा दिला पाहिजे : बी. बी. मेश्राम




मित्र हो,

प्रथमतः आपण सर्वांना नामविस्तार दिनाच्या कोटी कोटी सदिच्छा प्रदान करतो.

आपण सर्व जण १४ जानेवारीला पूर्वीचे औरंगाबाद आताचे छत्रपती संभाजी नगर स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या गेट समोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी लाखोंच्या संख्येने एकत्रित येतो. नैमित्तिक दृष्टीने वर्षातून एक दिवस एकत्रित येत असलो तरी दुसऱ्या दिवसापासून आपण मात्र वैचारीक दृष्टीने विभक्त राहून जीवन जगत असतो. तरी आपल्या जीवन जगण्याला बौद्धिक व आंबेडकराईट वळण लागण्यासाठी आंबेडकराईट विचारधारा ही आपल्या जीवन जगण्याचा अविभाज्य भाग होणे आवश्यक आहे. करिता आपण त्या विचारधारेचे तंतोतंत काटेकोरपणे पालन, आचरण केले पाहिजे. या अनुषंगाने आम्ही आपण स्वतःला प्रश्नांकित पिंजऱ्यात उभे केले पाहिजे. ते करू शकलो तरच आपण इतरांना तसे करण्यासाठी अपील करू शकतो ज्यातून सामान्य जनता या अनुषंगाने संघटीत होण्यासाठी संघर्षाचे पाऊल उचलू शकेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८ जुलै १९४५ ला पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली होती. ज्या अंतर्गत २० जून १९४६ ला मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची तर औरंगाबाद येथे १९ जून १९५० ला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली आहे. त्यावेळी मिलिंद महाविद्यालयाच्या पायाभरणी प्रसंगी गोविंद भाई श्रॉफ आणि माणिकचंद पहाडिया यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भेटीला आले होते. त्या शिष्टमंडळाने 'आपण हे जे महाविद्यालय सुरू करीत आहात, ते या ठिकाणी चालेल काय?' असा शंकास्पद प्रश्न उपस्थित केला होता. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्गारले की, येथे केवळ एक महाविद्यालय उभारून चालणार नाही तर एक विद्यापीठ सुद्धा उभारले पाहिजे, अशी इच्छा व्यक्त केली होती. यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक दूरदृष्टी आपल्या लक्षात येते. त्यांनी जागतिक स्तरावरील उच्च कोटींच्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठातून ज्ञानार्जन केले होते. त्यामुळे, तसेच विद्यार्थी या शैक्षणिक संस्थेतून तयार व्हावेत जेणेकरून मानवतावादी समाज निर्माण करता येईल, जी या लोकशाहीप्रधान आधुनिक भारताची गरज आहे. १५ डिसेंबर १९५२ ला एल्फिन्स्टन कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनात आधुनिक विद्यार्थ्यांच्या समस्यांवर मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आधुनिक जगातील आवश्यकतेच्या पूर्ततेसाठी केवळ प्रशिक्षित कारकुनांची निर्मिती करणारे केंद्र चालवून काम भागणार नाही, तर शक्तीवर्धक ज्ञानाचे प्रतीक असणारे विद्यापीठ चालवावे लागतील. ज्यातून जीवनाच्या सर्व क्षेत्रात सक्षम मनुष्यबळ निर्माण होऊ शकेल. विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाची उभारणी विद्यापीठातच होत असेल तर त्यांनी या अनुषंगाने फार सजग राहिले पाहिजे. विद्यापीठांच्या कारभारावर कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. विद्यापीठाने ठरविलेला निर्धारित अभ्यासक्रम शिकत असताना तो आपल्या बौद्धिक विकासाला खरोखरच पोषक व आवश्यक आहे किंवा नाही? याकडे पण चिकित्सकतेने लक्ष केंद्रित केले पाहिजे. म्हणजे ज्ञानाची कास धरून आपल्या देशाचा विकास आणि उद्धार करून घ्यायचा असेल तर विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या कारभारात लक्ष घालून आपल्या हक्कांसाठी सतत झगडत राहिले पाहिजे. अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यापीठाची उपयोगिता कशी असावी? हे स्पष्ट केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांचे फलित म्हणून २३ आगस्ट १९५८ ला मराठवाड्यातील औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. विद्यापीठाला काय नांव द्यावे? हे ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या शासकीय समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार मराठवाडा, औरंगाबाद, पैठण, प्रतिष्ठान, दौलताबाद, देवगिरी, अजिंठा, शालिवाहन, सातवाहन यासारखी स्थळ, भूमी व राज्यवाचक नांवे समोर आली होती. तसेच छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महान व्यक्तींची नावे सुद्धा पुढे आली होती. मात्र यापूर्वीच कोल्हापूर येथील विद्यापीठाला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव दिले गेले असल्याने औरंगाबाद येथील विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नांवावर शिक्कामोर्तब करण्यासाठी राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात २७ जुलै १९७८ ला एकमताने ठराव संमत करण्यात आला होता. नामांतर आंदोलनाच्या ऐतिहासिक पाऊलखुणा तपासताना २७ जुलै १९७८ या तारखेला त्या आंदोलनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण याच दिवशी महाराष्ट्र राज्याच्या दोन्ही सदनात विद्यापीठाच्या नामांतराचा ठराव संमत करण्यात आला होता. तसेच १४ जानेवारी १९९४ ला मराठवाडा विद्यापीठाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असा नामविस्तार करण्यात आला. त्यामुळे या दोन्ही दिवसाचे ऐतिहासिक दृष्ट्या अनन्य साधारण महत्त्व आहे. या बाबी सामाजिक न्याय, ओळख, प्रतिष्ठा आणि बहुजन समाजाच्या हक्क अधीकाराशी निगडित आहेत. या आंदोलनाची पार्श्वभूमी समजून घेताना काही महत्त्वाचे ऐतिहासिक आणि सामाजिक घटक लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. ड्रूलेश्रे ष ज्ञपेुश्रशवसश अर्थात ज्ञानाचे प्रतीक विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे संविधानाचे निर्माते असून समाज सुधारक व वंचित, पीडितांच्या आंदोलनाचे प्रणेते होते. ज्यांनी शैक्षणिक सुधारणा, मानवी हक्क, आत्मसन्मान, आत्मभान येण्यासाठी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय प्राप्त करून घेण्यासाठी सामाजिक जीवनात शेवटच्या श्वासापर्यंत संघर्ष केला परिणामी वंचित मूल भारतीय बहुजन समाजासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक प्रेरणादायी नेतृत्व ठरलेले आहेत.

ही ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता खुसरो ए दक्कन, मूल भारती संकल्पनेचे पितामह बी. श्यामसुंदर यांच्या नेतृत्वाखाली १ जानेवारी १९६५ ला नांदेड येथे संपन्न झालेल्या परिषदेत चार ठराव पास करण्यात आले होते. त्यापैकी तिसरा ठराव हा शेड्युल्ड कास्ट स्कॉलर व प्रामाणिक सहानुभूतीदार यांच्या नेतृत्वाखाली शेड्युल्ड कास्ट लोकांच्या विकासासाठी चालविले जाणारे विद्यापीठ त्वरीत निर्माण केले जावे, अशी भूमिका मांडण्यात आली होती. ज्यात डॉ. आंबेडकरांनी मुंबई व औरंगाबाद येथे सुरू केलेल्या महाविद्यालया सारखी महाविद्यालये इतरही राज्यात स्थापन व्हावीत. ज्यांना त्या त्या राज्यातील विद्यापीठांशी संलग्नित केली जावीत. तसेच डॉ. आंबेडकरांच्या नांवाने सुद्धा विद्यापीठ सुरू करावे. अशी त्यांनी अपेक्षा व्यक्त केली होती. ज्याला २६ जानेवारी १९६८ ला नांदेड येथे संपन्न झालेल्या दि ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट कॉन्फरन्स मध्ये मंजुरी देण्यात आली होती. पुढे बी. श्यामसुंदर यांनी मूल भारती समाजाच्या उत्थानाकरिता लढा देण्यासाठी २९ एप्रिल १९६८ ला भारतीय भीम सेनेची स्थापना केली होती. त्यामुळे नामांतर आंदोलनाच्या इतिहासातून खुसरो ए दक्कन बी शामसुंदर यांचे नाव कोणालाही पुसता येणार नाही.

दरम्यान १९७२ च्या काळात दलितांना गायरान जमिनी मिळाव्यात, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करावी. गावातील पाणवठ्यांवर भेदभाव न करता पाणी भरू देण्यात यावे. यासारख्या समस्यांना तोंड देण्यासाठी दलित पँथर उदयास आली. त्याच काळात औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यात यावे ही मागणी पुढे आली. ती सामाजिक सन्मान, ओळख आणि समानतेचा प्रतिक होती. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी शैक्षणिक कार्याची, ज्ञानगंगा सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचावी म्हणून आपले संपूर्ण आयुष्य वेचले होते. म्हणून त्यांच्या नावे एक विद्यापीठ असावे, असे अनुयायाने वाटत होते. म्हणून ती मागणी रास्त होती. ज्याला दलित पँथर मधील तत्कालीन नेते राजा ढाले, नामदेव ढसाळ, प्रा. अरुण कांबळे, ज. वि. पवार, रामदास आठवले, गंगाधर गाडे सह इतर सर्व नेतृत्वाने नेटाने चालविण्याचा प्रयत्न केला. १९७४ च्या मराठवाडा विकास आंदोलनातही नामांतराची मागणी करण्यात आली होती. १९७७ ला तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मागणीची दखल घेऊन आश्वासन दिले होते. मात्र १९७८ ला सरकार बदलले आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली पुलोद सरकार सत्तारूढ झाले. विधान परिषदेत आमदार पा. ना. राजभोज यांनी मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करावे अशी मागणी लावून धरली होती. तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी नामांतराबाबत पुढाकार घेऊन राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात २७ जुलै १९७८ ला नामांतराचा ठराव मंजूर करून घेतला.

मात्र याची वार्ता समाजजीवनात पसरताच विघ्नसंतोषी, समाजविघातक सवर्णांनी विद्यापीठाला केवळ एखाद्या व्यक्तीचे नाव देणे पक्षपाती ठरेल, असा युक्तिवाद करून नामांतराच्या मागणीला प्रखर विरोध केल्याने सरकारला अंमलबजावणी करणे अशक्य झाले. परिणामी संघर्ष सुरू होऊन दलितांवर अनन्वित अत्याचार करण्यात आले. नांदेड येथील दलित पँथरचे भीम सैनिक गौतम वाघमारे यांनी भर चौकात स्वतःला जाळून घेतले. परभणी जिल्ह्यातील पोचिराम कांबळे यांचे समाज कंटकांनी हात पाय तोडले आणि जर्जर करून ठार मारले. जनार्दन मवाडे, संगीता बनसोडे, सुहासिनी बनसोड, प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, चंदर कांबळे, दिलीप रामटेके, रोशन बोरकर असे अनेक क्रांतिवीर नामांतरासाठी शहीद झाले. या अनुषंगाने प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद असा लाँगमार्च काढला होता. त्या लाँगमार्चला बुलढाणा जिल्ह्यातील रायरीच्या पुलावर अडविण्यात आले होते. त्यातील आंदोलकांना अटक करून राज्यातील विविध कारागृहात डांबण्यात आले होते. त्यामुळे प्रा. जोगेंद्र कवाडे यांना लाँगमार्च प्रणेते असे म्हटले जाते.

शेवटी १७ वर्षाच्या प्रदीर्घ आंदोलनाच्या संघर्षानंतर १४ जानेवारी १९९४ ला 'मराठवाडा विद्यापीठाचा' विस्तार मराठवाडा हा शब्द कायम ठेवून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.' असा नामविस्तार करण्यात आला. त्यामुळे जनता लाखोच्या संख्येने या दिवशी विद्यापीठ गेट वर, गेटच्या बाहेर नतमस्तक होण्यासाठी येत असतात, परंतु आता आपणास खरे बाबासाहेब विद्यापीठाच्या आत अभ्यासक्रमात शोधावे लागेल. ही सर्व पार्श्वभूमी व इतिहास लक्षात घेतल्यावर नामविस्तार तर झाला पण त्यामुळे आंदोलन संपले की काय? पुढे काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरित राहिला आहे. त्याची समर्पक उत्तरे आपण कधी शोधणार आहोत किंवा नाही? ज्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नांव दिलेले आहे. त्या विद्यापीठात बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान, विचारधारा किती प्रमाणात आणि कशाप्रकारे शिकविल्या जात आहे? विद्यापीठात महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा संशोधन केंद्र आहे. त्या अंतर्गत महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. त्यात बोटावर मोजता येतील एवढेच विद्यार्थी प्रवेश घेत असतात? म्हणजे विद्यापीठात अनेक विभागात ज्या प्रमाणात विद्यार्थी प्रवेश घेतात त्याचा विचार केला असता सर्वात कमी विद्यार्थी प्रवेश घेणारा विभाग म्हणजे महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा हा विभाग होय असे म्हटल्यास वावगे, अनुचित होणार नाही. ज्या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिलेले आहे, त्याच विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा समजून घेऊन समजावून सांगण्यासाठी, शिकविण्याविषयी असणारी अनास्था अनाकलनीय आहे. या अनुषंगाने विद्यापीठात कार्यरत असणारे विद्वान प्राध्यापक मंडळी, विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, कुलगुरू, कुलसचिव व इतर सर्व पदाधिकाऱ्यांनी यावर विचार केला पाहिजे. संबंधित विषयाची एवढी दुरावस्था का? याची कारणे शोधून काढली पाहिजेत. त्या विषयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नेट, सेट, पेट परिक्षा देता येतात काय? नुकत्याच विद्यापीठाने २०२४ मध्ये घेतलेल्या पेट परिक्षेत 'महात्मा फुले व डॉ. आंबेडकर विचारधारा' आणि 'पाली एंड बुद्धिजम' या विषयाचा नामोल्लेख सुद्धा टाळला होता. म्हणजे यासारख्या विषयात विद्यार्थ्यांनी संशोधन करू नये, अशी विद्यापीठाची भूमिका असल्याची त्या पेटच्या नोटिफिकेशन्स मधून स्पष्ट झालेले आहे. विद्यापीठ त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व महाविद्यालयांना हे विषय शिकविण्यासाठी विशेष उपाययोजना करणार आहे काय? बार्टी सारख्या स्वायत्त संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर संशोधन करण्यासाठी किती निधी खर्च करतात? यु जी सी सारख्या संस्था नेट सेट पेट सारख्या परीक्षा करिता सदरील विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी प्रयत्नशील आहेत काय? भारतातील सर्व केंद्रीय, राज्य, माहिती तंत्रज्ञान व मुक्त विद्यापीठ, खुले विद्यापीठे, विशेष विद्यापीठे तसेच खाजगी विद्यापीठातून सदरील विषय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यासाठी शासन प्रशासनाने प्रयत्न करावेत? डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा देण्यात यावा. या विषयात शैक्षणिक अर्हता प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना विविध नौक-यात सामावून घेतले पाहिजे. या विषयांत प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभात गौरव करण्यात आला पाहिजे. जेणेकरून विद्यार्थी संबंधित विषयात शिक्षण घेण्यासाठी पुढे येऊ शकतील. अशा सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे शोधून उपाययोजना केल्या तर या माध्यमातून सुद्धा विद्वान, प्रज्ञावान, शीलवान, चारित्र्यसंपन्न आंबेडकराईट निर्माण होऊ शकतील. ज्ञानाचे प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महासागरातून वेचलेले वैचारिक अनमोल मोती आपल्या जीवनात आकार देण्यासाठी सक्षम असल्याने ते समजून घेणे आवश्यक आहे. ही आपल्या जीवनाची प्राथमिकता असावी. ज्याची समाजाला नितांत आवश्यकता आहे. परिणामी भारताचे संविधानाला अपेक्षित आधुनिक भारतीय समाजाची निर्मिती होऊ शकेल. लेखाची समाप्ती करताना मी आपणास या बाबीची आठवण करून देऊ इच्छितो की आपणास दिवसभरात भेटणाऱ्या अनेकांना 'जय भीम' म्हणत असतो. परंतु या जय भीम ची सुरुवात कोणी आणि कशी केली? याचा इतिहास पण समजून घेतला पाहिजे. त्या अनुषंगाने विचार करतात याच महिन्यात जय भीम चे जनक एल. एन. हरदास यांची जयंती आहे. त्यांना अभिवादन करताना आपण हे समजून घेतले पाहिजे की, त्यांनी जय भीम ची सुरुवात करताना दोन व्यक्ती एकत्र भेटत असताना पहिल्या व्यक्तीने जय भीम म्हटल्यानंतर समोरील व्यक्तीने बल भीम म्हटले पाहिजे. असे ठरले होते. बऱ्याच काळपर्यंत तसे वापरले गेले. मात्र काळाच्या ओघात जय भीम चा प्रघात वाढला आणि बल भीम हळूहळू कमी होऊन, नाहीसे झाले. परिणामी भीमचा जयजयकार करीत असताना बल न राहिल्याने, परिणाम निष्प्रभ होत चालले आहेत. याची जाणीव ठेवून जय भीम ला पुढे नेण्यासाठी आवश्यक त्या प्रमाणात सर्व प्रकारचे संसाधने उपलब्ध करून देऊन बल दिले पाहिजे. म्हणजे जय भीम चा विजय निश्चित होईल.

जय भीम बल भीम!
जय भीम बल भीम!!
जय भीम बल भीम!!!

लेखक : बी. बी. मेश्राम, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र, ४३१००२.
संपर्क : ९४२१६७८६२८
stdbbm@gmail.com

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राज्याची योग्य व्यवस्था ही लेखणीच्या माध्यमातूनच करता येते

## प्रा. डॉ. अरुण घोडके यांचे प्रतिपादन; माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्राला मिळालेले वरदान आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने हिंदवी राज्याची निर्मिती केली. त्यांच्या जीवाला जीव देणारे मावळे मिळाले. माँसाहेब जिजाऊ यांनी आपल्या स्वप्नातील स्वराज्य निर्माण करण्यासाठी शिवबाला धडे दिले. तलवारीपेक्षा लेखणी श्रेष्ठ असते. हा मोलाचा संदेश शिवाजी महाराज यांनी दिला. तलवारीच्या बळावर राज्य निर्माण करता येते. मात्र त्या राज्याची व्यवस्था ही योग्य लेखणीच्या माध्यमातूनच करता येते.'असे प्रतिपादन



सुप्रसिद्ध शिव व्याख्याते प्रा. डॉ. अरुण घोडके यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त इतिहास विभाग व प्राचीन इतिहास व संस्कृती विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. भगवान नाईक नवरे हे होते. यावेळी मंचावर अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ. समाधान माने आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. डॉ. अरुण घोडके म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराज यांनी अनेक गड आणि किल्ल्यांची निर्मिती केली. या गड किल्ल्यांना अभेद्य ठेवणारी माणसे मिळवली. निस्वार्थी आणि धाडसी माणसे निर्माण केल्यामुळेच स्वराज्य निर्माण करता आले. विद्यार्थ्यांनी शिवचरित्र अभ्यासले पाहिजे. चांगली चरित्रे वाचल्या शिवाय चारित्र्य घडत नाही. म्हणून इतिहासातून बोध घ्यावा.'

अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील विविध पैलू आपण समजून घेतले पाहिजेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते. विद्यार्थ्यांनी शिव छत्रपती चरित्रांचे चिंतन करावे.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचीन इतिहास विभागप्रमुख डॉ. गोवर्धन दिकोंडा यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. भारती सुडके यांनी केले. या कार्यक्रमात इतिहास विषयातून पीएच. डी. पदवी संपादन केल्याबद्दल प्रा. डॉ. सुवर्णा हजारे-डांगे यांचा सत्कार करण्यात आला. त्याबद्दल त्यांनी धन्यवाद व्यक्त केले.

समारंभ समितीच्या वतीने माँसाहेब जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास समारंभ समिती प्रमुख प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे, प्रा. डॉ. उमेश साळुंखे, प्रा. सुमन केंद्रे, प्रा. कल्याण वाटाणे, प्रा. बाळासाहेब गायकवाड, प्रा. विनोद आखाडे आदी प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते. शेवटी इतिहास विभागप्रमुख डॉ. दत्तात्रय चौधरी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

---

# कृषी संजीवनी प्रकल्प शेतकरी वर्गाला वरदानच



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी/प्रतिनिधी :

मौजा खैरी येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा दोन अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र,हिवरा यांचे स्तरावरुन तालुक्यातील खैरी गावाची निवड करण्यात आली..मा.श्री उबरहांडे वरीष्ठ शास्त्रज्ञ, यांनी योजने अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध बाबी तथा प्रात्यक्षिके , बियाणे या विषयी मार्गदर्शन केले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पा अंतर्गत , सूक्ष्म सिंचन योजना (ठिंबक व तुषार) विषयी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९० टक्के अनुदान, वैयक्तिक शेततळे अनुदान, शेततळ्याचे अस्तरीकरण करणे, विहीर पुनर्भरन योजना ,फळबाग लागवड करणे, बांबू लागवड करणे, गांडूळ खत व नाडेप- कंपोस्ट उत्पादन युनिट तयार करणे, बीज उत्पादन घटक राबविणे ,शेडनेटगृह अथवा हरितगृहातील लागवड साहित्य निर्माण करणे, अनुसूचित जाती व जमातीमधील पाच हेक्टर पर्यंत शेतकऱ्यांना लाभ देणे, प्लास्टिक पाईप, एचडीपीई पाईप १००% अनुदानावर आणि पंपसंच अथवा डिझेल इंजिन ९०% अनुदान, रेशीम उद्योग तयार करणे, गोड्या पाण्यातील मत्स्य पालन करणे आणि खैरी गावातील भूमिहीन कुटुंबातील व्यक्तींना शेळी पालन योजनेचा लाभ देणे याकरिता शेतकऱ्यांनी ऑनलाइन करणे याबाबत सविस्तरपणे मार्गदर्शन सौ.सुलक्षणा पाटोळे तालुका कृषी अधिकारी , अर्जुनी मोर,यांनी केले. श्री चव्हाण सहा. प्राध्यापक,मा. कोरे सहा. प्राध्यापक तथा मा.वरखडे मंडळ कृषि अधिकारी,श्री राजेश संग्रामे उप कृषी अधिकारी,श्री आदर्श मेश्राम उप कृषी अधिकारी, नवेगावबांध उपस्थित होते.

विलास गहाणे सहाय्यक कृषि अधिकारी यांनी प्रास्ताविक करुन उपस्थितांचे आभार व्यक्त केले.. सौ रत्नमाला राऊत कृषि ताई, हेमराज राऊत, मंदाताई गावळ यांनी कार्यक्रमात सहकार्य केले. गावातील शेतकरी व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# सैनिक स्कूल तुळजापूर येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा

तुळजापूर/प्रतिनिधी : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम विद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. पेटकर सर , श्रीनिवास कदम सर तसेच उपस्थित मान्यवर क्रीडा कोच अक्षय बिराजदार सर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले . विवेकानंदांचे जीवन चरित्र, कार्य ,शिक्षण विषयक विचार याबद्दल मार्गदर्शन केले तर श्री सलगर सर यांनी राजमाता जिजाऊ यांच्या अमूल्य कार्याबद्दल माहिती दिली . सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री दिलीप सलगर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री सुत्रावे सर यांनी केले .



---

# युती आघाडीशिवाय निवडणूक लढवण्याचा कार्यकर्त्यांचा संजय मामा शिंदे यांच्याकडे आग्रह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित दादा पवार गट) कार्यकर्ता मेळावा आज दिनांक १२ जानेवारी रोजी नालबंद मंगल कार्यालय येथे हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या मेळाव्यामध्ये एड. अजित विग्रे, एड. नितीन राजे भोसले, अण्णासाहेब पवार, सुजित तात्या बागल, रोहिदास सातव, दत्तात्रय अडसूळ, दादासाहेब जाधव, विनय ननवरे, रवींद्र विळेकर, या कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त करताना राष्ट्रवादी



काँग्रेस पक्ष (अजित दादा पवार) गटाने संजय मामा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करमाळा जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक स्वबळावर लढवावी असा नारा दिला व कुर्डूवाडी नगर परिषदेमध्ये ज्या पद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने हे संपादन केले तसेच या मतदारांच्या विश्वासाच्या बळावर जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूकीत निश्चितच मिळेल असा ठाम विश्वास या कार्यकर्त्यांनी बोलून दाखवला.

यावेळी व्यासपीठावर सुभाष आबा गुळवे तात्यासाहेब मस्कर चंद्रकांत सरडे राजेंद्र कुमार बारकोड नवनाथ भांगे ड गिरजे, विलास दादा पाटील, तानाजी झोळ विलास राऊत अशोक पाटील विवेक येवले प*** सरडे निळकंठ अभंग तात्यासाहेब जाधव चंद्रकांत रि सुहास रोकडे नानासाहेब निळ उद्धव दादा माळी अँड अजित विघ्नेश सुजित बागल नानासाहेब लोकरे नानासाहेब मोरे प्रकाश थोरात तात्या मामा सरडे राजेंद्र धांडे डॉक्टर गोरख गुळवे राजेंद्र बाबर विनय ननवरे बापू साखरे अभिजीत पाटील शंकर जाधव सुदाम शेळके यांना साहेब पवार सुदाम बाबा साळुंखे दत्तात्रय राजाभाऊ देशमुख सोमनाथ रोकडे संदीप तळेकर बाळासाहेब ढेरे मयूर पाटील गौरव झांजुर्णे गणेश पाटील उमेश इंगळे महेश गंगणे आणि शेजार रवींद्र तळेकर अशोक तकिका प्रमोद बंदी रोहिदास सातव विकास गोंदेकर युवराज बापट आदी मान्यवर उपस्थित होते.

---

# वैनतेय विद्यालयाचे शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत सुयश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :निफाड येथील वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत यश मिळविले आहे. या विद्यालयातील एलिमेंट्री ग्रेड परीक्षेसाठी ७४ विद्यार्थी व इंटरमिजिएट साठी ६२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते एलिमेंट्री ग्रेड परीक्षेचा ९८ टक्के निकाल लागला असून इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेचा निकाल १००टक्के लागला आहे. एलिमेंट्री ग्रेड परीक्षेतून अ श्रेणीत १७ विद्यार्थी , ब श्रेणीत २१विद्यार्थी, क श्रेणी ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत अ श्रेणी ७, ब श्रेणीत १४ विद्यार्थी, क श्रेणीत ४१ विद्यार्थी, उत्तीर्ण झाले.या विद्यार्थ्यांना कलाशिक्षक भूषण सोनवणे व सुभाष गवळी यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, मधुकर राऊत, विश्वास कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला याप्रसंगी प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर पर्यवेक्षक बी.बी . गुंजाळ,श्रीमती आर एम लाहोटी आदीसह शिक्षक उपस्थित होते यशस्वी विद्यार्थी व कलाशिक्षक यांचे न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, सचिव रतन पाटील वडघुले,विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, ड.दिलीप वाघवकर, राजेंद्र सोनी, प्रभाकर कुयटे,मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे ,प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर पर्यवेक्षक बी.बी . गुंजाळ,श्रीमती आर एम लाहोटी यांनी अभिनंदन केले आहे.

---

# दयानंद महाविद्यालयात युवक दिनानिमित्त प्रबोधन शिबिर संपन्न




**राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उदघाटन प्रसंगी प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर दिसत आहेत. तर व्यासपीठवर प्रा. डॉ. नभा काकडे, डॉ. एन. बी. तेली. प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी, प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर, सुगतरत्न गायकवाड, प्रा. दीपाली कसबे, प्रा. डॉ. महेश साखरे आदी दिसत आहेत.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : स्वामी विवेकानंद हे विश्व संस्कृतीचे उपासक होते. त्यांनी माणूस घडवणाऱ्या धर्माचा व चारित्र्य निर्माण करणाऱ्या शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांनी राष्ट्राला दैवत मानून तरुणांना शिवभावे, जीवसेवा करण्याचे आवाहन केले. प्रत्येक माणसात परमेश्वर असतो. प्रत्येकाने धार्मिक, सहिष्णूता पाळल्यास जगात शांतता नांदेल अशी आशा व्यक्त केली होती असे प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी सांगितले. सोलापूरच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दल बोलताना ते म्हणाले, चार नरवीरांनी पत्करलेले हौतात्म्य, पारतंत्र्यात ही चारदिवस स्वातंत्र्य उपभोगलेले हिंदुस्थानातील एकमेव शहर परिणामी ब्रिटिशांनी पुकारलेला मार्शल लॉ असा सोलापूरचा स्वातंत्र्यलढ्यातील सहभाग लक्षणीय, प्रेरणादायक असून तो अतुलनीय त्यागाचा, स्फूर्तीदायक, पराक्रमाचा असल्याने तरुणांनी तो इतिहास जाणून स्वराज्याचे सुराज्य निर्माण करण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न करण्याचे आवाहन प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा व दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, एन.एस.एस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय युवा दिन - स्वामी विवेकानंद जयंती, राजमाता जिजाऊ जयंती व हुतात्मा दिनानिमित्त आयोजित प्रबोधन शिबिरात ते राष्ट्र संजीवक स्वामी विवेकानंद, मार्शल लॉ या विषयवार प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. तर प्रा. डॉ. नभा काकडे यांनी राजमाता जिजाऊ यांचे जीवनकार्य या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी.एच.दामजी हे होते.

यावेळी व्यासपीठावर एफ.पी.ए.आय. सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा.डॉ.एन.बी.तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, दयानंद महाविद्यालय, एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर, प्रा. डॉ. सुनीता गाजरे, प्रा. डॉ. साखरे मॅडम, डॉ. राजशेखर शिंदे, प्रा. डॉ. महेश साखरे, प्रा. बेरूणगीकर आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. नभा काकडे म्हणाल्या की, राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या सुसंस्कारातून छत्रपती शिवाजी महाराज घडले. त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यास प्रेरणा दिली. प्रत्येक स्त्रीने निर्भय होऊन संस्कारक्षम पिढी घडविल्यास बलशाली राष्ट्र निर्माण होऊ शकते.

दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. एच.दामजी यांनी अध्यक्षीय समारोप केला.

मान्यवरांचा परिचय प्रा. डॉ. महेश साखरे यांनी केला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. दीपाली कसबे यांनी केले. स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर यांनी केले तर आभार सुगतरत्न गायकवाड यांनी केले.

---

# अकलूज (संग्राम नगर) येथील विकसित कॉलनीचे जिजाऊ नगर नामकरण

पंढरपूर/प्रतिनिधी

अकलूज संग्राम नगर येथील नव्याने विकसित करण्यात आलेल्या कॉलनी जिजाऊ नगर असे नामकरण करण्यात आले या कॉलनीचे उद्घाटन अकलूज नगरपरिषदेची नगरसेवक सयाजी राजे मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते पार पडले. जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ जयंती निमित्त राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनीने करण्यात आली उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले यानंतर मान्यवरांचा सन्मान करण्यात आला यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या जीवन कार्यावर प्रेरणादायी भाषणे झाले



जिजाऊ ब्रिगेडच्या पुणे विभागीय अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर मीनाक्षी जगदाळे, यांनी जिजाऊच्या विचारांचा व समाज घडणीतील त्यांच्या योगदानाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्या म्हणाले की जिजाऊ नगर हे नाव केवळ एका कॉलनीचे नसून प्रेरणादायी विचारांची प्रतीक आहे राजमाता जिजाऊ यांनी दिलेली संस्कार धैर्य आणि राष्ट्रभक्तीची शिकवण या नावातून प्रतिबिंबित होते. या नावामुळे इतिहासाची आठवण कायम जिवंत राहते.जिजाऊ नगर हे नाव महिलांच्या सन्मानाची व सक्षमीकरणाची प्रतीक आहे समाजात नैतिक मूल्य रुजवण्याचा संदेश या नावातून मिळतो भावी पिढीला आदर्श जीवन मूल्याची ओळख करून देणारे हे नाव आहे व जिजाऊ नगरमुळे परिसरातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख प्राप्त होणार आहे.

हे नाव निवडणे म्हणजे महान परंपरेला मानवंदना देणे होय जिजाऊंच्या विचाराप्रमाणे संस्कारक्षम आणि सुसंस्कृत समाज घडावा, हीच अपेक्षा आहे जिजाऊ नगर हे नाव सदैव अभिमानाने उच्चारले जाईल, असे नाव आहे तसेच संग्राम नगर ग्रामपंचायतचे सरपंच अजित रेवंडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले व जिजाऊ च्या जीवनावर व्यक्त केले.

या कार्यक्रमास संग्राम नगरचे सरपंच अजित रेवंडे उपसरपंच राजकर प्रहार संघटनेचे संपर्कप्रमुख माननीय अमोल जगदाळे युवा सेना जिल्हाध्यक्ष महेश इंगळे ,सचिन गायकवाड ,समर्थ जगदाळे राजू सोनवणे, अनिल कदम ,शहाजी वाघ, डॉक्टर संतोष काटकर, डॉक्टर मंगेश शिंदे, डॉक्टर विशाल साळुंखे, अभिजीत वाघ, आकाश मुंजाळ, गणेश कदम सचिन लोखंडे, सतीश रेवंडे बबन शेंडगे सचिन रेवंडे हनुमंत रेवंडे गुणवंत अंधारे, सुमन तांडारे राजेश कांबळे शकील दस्तगीर जिजाऊ ब्रिगेडचे उपाध्यक्ष सुषमा पाटील पल्लवी काटकर विद्या मुघुस्कर विद्या साळुंखे मनीषा कदम विनोदनी अंधारे उज्वला आडणे रेशमा ननवरे आणि मान्यवर नागरी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल जगदाळे व आभार प्रदर्शन राजू सोनवणे यांनी मांडले.

# सर्व वाहन चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

## रस्ते अपघातात मानवी तसेच तांत्रिक चुकांचे प्रमाण अधिक असल्याने वाहनचालकांनी दक्षता घ्यावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर(जिमाका):- संपूर्ण देशभरात तामिळनाडू व महाराष्ट्र राज्यात रस्ते अपघातांचे प्रमाण खूप अधिक आहे. रस्ते अपघातामध्ये मानवी चुका तसेच तांत्रिक चुकांचाही समावेश आहे. तरी सर्व प्रकारच्या वाहन चालकांनी परिवहन विभागामार्फत करण्यात आलेल्या वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.

नियोजन भवन येथे ३७ वे जिल्हा रस्ता सुरक्षा अभियान या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दीप प्रज्वलनाने केले. यावेळी महापालिका आयुक्त सचिन ओंबसे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम , पोलीस आयुक्त एम राजकुमार , पोलीस अधीक्षक ग्रामीण अतुल कुलकर्णी, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम शामराव कुंभार, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, पोलीस उपायुक्त शहर गौहर हसन, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अकलूज अमरसिंह गवारे, सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आसिफ मुलाणी तसेच अधिकारी कर्मचारी मोटर ड्रायव्हिंग स्कूल संघटनेचे पदाधिकारी, रिक्षा चालक-मालक संघटना पदाधिकारी व इंजीनियरिंग कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, सोलापूर शहरामध्ये कोणीही दुचाकी चालवत असताना हेल्मेट वापरत नसल्याचे दिसते. वाहन

■ जिल्हाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते रस्ते अपघातात जखमी झालेल्या नागरिकांना मदत करणाऱ्यांना जीवनदीप पुरस्कार देऊन सन्मान
■ ३७ वे जिल्हा रस्ता सुरक्षा अभियानाचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते उद्घाटन

चालवताना अतिवेग व चुकीच्या बाजूने ओव्हरटेक करणे, सिग्नलचे पालन न करणे यामुळे अपघात होत असतात, सर्व वाहनचालकांनी विशेषता तरुण वर्गाने वाहतुकीचे नियम पाळणे आवश्यक आहे तसेच आपल्या संपर्कातील घरातील इतर व्यक्तींना वाहतुकीचे नियम पाळण्यास जागृत केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी प्रास्ताविक करताना प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी रस्ते अपघाताची कारणे व रस्ते अपघाताचे प्रमाण तसेच अपघात टाळण्यासाठी काटेकोरपणे नियमाचे पालन करणे व १८ ते ४५ वयोगटात तीन व्यक्तींचा अपघातात मृत्यू पडण्याचे प्रमाण जास्त असल्याचे सांगितले तसेच सोलापूर जिल्ह्यात अपघाताचे प्रमाण जास्त असल्याचेही त्यांनी सांगितले आज १३ जानेवारी हा दिवस देशभरामध्ये रस्ता सुरक्षा अभियान म्हणून साजरा केला जातो त्या अनुषंगाने तरुण वर्गाने दुचाकी चालवताना हेल्मेट चा वापर करणे रस्त्यावरील वाहतुकीचे नियमाचे पालन करणे वेग मर्यादा पाळणे याबाबत मार्गदर्शन केले.



सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता शामराव कुंभार यांनी रस्त्यांची स्थिती रस्त्यावरील फलक वेग या तांत्रिक बाबीचे अवलोकन वाहनधारकांनी वाहन चालवताना केल्यास रस्त्याचे अपघात कमी होऊ शकतात. रस्त्याचे बांधकाम हे त्या त्या परिस्थितीनुसार केलेले असते त्यानुसार वाहन चालकाने वाहनाच्या वेगावर नियंत्रण ठेवले पाहिजे असे सांगितले.

तसेच या रस्ते अपघातात जखमी लोकांना मदत करून त्यांना जीवदान दिलेले जीवनदूत अशा व्यक्तींना जिल्हाधिकारी व इतर अधिकाऱ्यांच्या हस्ते जीवनदीप पुरस्कार देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये पोलीस अधिकारी कर्मचारी, प्रादेशिक परिवहन कर्मचारी ,तसेच समाजातील इतर व्यक्तींचा समावेश होता.

प्रारंभी जिल्हा रस्ता सुरक्षा समिती सोलापूर, प्रादेशिक परिवहन कार्यालय सोलापूर व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ३७ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२६ चे उद्घाटन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील यांनी केले.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या रा.से.यो. श्रमसंस्कार शिबिराचे अजनसोंडमध्ये उदघाटन



पंढरपूर- स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे अजनसोंड (ता. पंढरपूर) मध्ये आयोजिलेल्या 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा'चे नुकतेच उदघाटन करण्यात आले.

स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन मौजे अजनसोंड (ता. पंढरपूर) मध्ये दि.१० जानेवारी २०२६ ते दि.१६ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उदघाटन दि. १० जानेवारी २०२६ रोजी उत्साहात पार पडले. उदघाटन समारंभास अजनसोंडचे सरपंच रामचंद्र गोरख घाडगे, उपसरपंच बाळासो कांबळे, पोलीस पाटील सौ.मेघा समाधान घाडगे, तंटामुक्तीचे अध्यक्ष शशिकांत पाटील तसेच इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यासोबतच स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूरच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. या उदघाटन समारंभास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे तसेच पंढरपूर विभागाचे समन्वयक डॉ. संजय मुजमुले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

शिबिराची सुरुवात श्री संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी डॉ. राजेंद्र वडजे यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना समाजसेवेचे महत्त्व विशद करताना 'स्वयंशिस्त व राष्ट्रनिर्मितीतील युवकांची भूमिका' याबाबत विशेष मार्गदर्शन केले तसेच डॉ. संजय मुजमुले यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे, ब्रीदवाक्य व विद्यार्थ्यांची सामाजिक जबाबदारी याविषयी सविस्तर माहिती दिली. प्रास्तविकात स्वेरीच्या रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे यांनी आठवडाभर चालणाऱ्या या 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा'ची सविस्तर रूपरेषा मांडत विविध सामाजिक, स्वच्छता, जनजागृती व ग्राम विकास उपक्रमांची माहिती दिली. गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली 'विशेष श्रमसंस्कार शिबिरा' चे कार्य सुरळीतपणे सुरु आहे. या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून ग्रामविकास, स्वच्छता, सामाजिक बांधिलकी व सेवाभाव निर्माण करण्याचा उद्देश साध्य केला जाणार आहे. यासाठी अजनसोंडच्या ग्रामस्थांचे सहकार्य लाभत आहे. डॉ. यशपाल खेडकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.

# भिवंडीत निवडणूक यंत्रणा सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी पालिका निवडणूक यंत्रणा मतदानासाठी सज्ज झाली आहे.शहरात एकूण ७५० मतदान केंद्र असून ८२० मतदान यंत्र तर १६४० इव्हीएम असणार आहे. मतदारांना मतदानावेळी सावली मंडप, पिण्याचे पाण्याची व्यवस्था तसेच ज्येष्ठ नागरीक व दिव्यांग यांचेकरिता डोली व व्हिलचेअरची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. मतदान केंद्र असलेल्या इमारतींमध्ये मुख्य वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत प्रथमोपचार पेटीची व्यवस्था करण्यात आली असून, आशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात एक वैद्यकीय पथक, अँब्युलससह तैनात करण्यात आले आहे. शहरामध्ये मुस्लीमबहुल भागातील मतदान केंद्रावर पर्दानशीन महिला मतदारांची ओळख पटविण्यासाठी ३५० महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडणूकीकरिता एकूण ४५०० कर्मचाऱ्यांची तर १०० क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान केंद्रावर नियुक्त असलेल्या २६८ महिला कर्मचारी या अन्य शहरातून येणार असल्याने त्यांच्या निवासाची व्यवस्था देखील महानगरपालिकेने केली असल्याची माहिती मनपा निवडणूक विभागाने दिली आहे.

# कळंब उपजिल्हा रुग्णालय जागा निर्धारण प्रस्तावासंबंधी महत्वाचे निर्देश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : मित्रा संस्थेचे उपाध्यक्ष मा. आ. राणाजगजितसिंह पाटील यांची कळंब शहर विकास कृती संघर्ष समिती शिष्टमंडळाने कळंब येथील मंजूर उपजिल्हा रुग्णालय जागे संदर्भात भेट घेऊन चर्चा केली.

कळंब येथील प्रस्तावित उपजिल्हा रुग्णालयाच्या जागा निर्धारणासंबंधीचा प्रलंबित प्रस्ताव तात्काळ शासनाकडे प्पाठविणे बाबत मा. आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी जिल्हाधिकारी डॉ. कीर्तीकुमार पुजार यांना शिष्ट मंडळाची भेट घेऊन सदर विषयात लक्ष घालण्याचे निर्देश दिले.

मा. विधानसभेचे सदस्य राणाजगजितसिंह पाटील यांनी कळंब शहर विकास कृती संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाचे निवेदन ऐकून घेतले. सदर जागा उपजिल्हा रुग्णालयासाठी अधिग्रहण करण्याबाबत तत्काळ कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. त्यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन प्रस्तावाची सद्यस्थिती व प्रगती याबाबत सविस्तर चर्चा केली. जिल्हाधिकारी मा. डॉ. कीर्तीकुमार पुजार यांनी प्रक्रियेची गती वाढविण्यासाठी संबंधितविभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

या बैठकीत भारतीय जनता पार्टी कळंब शहर तालुका अध्यक्ष मकरंद पाटील, बाळासाहेब कथले, संतोष भांडे, प्रकाश भडंगे, सतपाल बनसोडे, बंधूभाऊ ताटे यांसह समितीचे इतर सदस्य उपस्थित होते.

पुढील कार्यवाही व अपेक्षा

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांनंतर सदर जागेवर उपजिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रलंबित आरोग्य प्रकल्पांना गती मिळावी, यासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता शासनाकडून त्वरित प्राप्त होईल, अशी अपेक्षा आहे. कळंब तालुक्यातील आरोग्यसेवा सुधारणेसाठी हे पाऊल महत्वाचे मानले जात आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भीम नगर नळदुर्ग येथे बाल आनंद मेळावा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के. गायकवाड) : तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भीम नगर नळदुर्ग येथे मुख्याध्यापक एस.यु. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तर येथील सहशिक्षिका सुलक्षणा टिळक यांच्या पुढाकारातून शालेय विद्यार्थ्यांच्या बाल आनंदी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी शाळेतच विद्यार्थ्यांनी भरावला होता विविध खाद्यपदार्थांचा बाजार.

या आनंदी मेळाव्यास येथील पालक व शिक्षण प्रेमी नागरिकांनी भेट देऊन आपल्या चिमुकल्या शालेय विद्यार्थ्यांनी भरविलेल्या विविध खाद्यपदार्थाच्या बैठा बाजारात पदार्थ खरेदी करून खरेदी विक्रीचा आनंददायीअनुभव विद्यार्थ्यांना दिला.

या बाल आनंदी मेळाव्याबाबत शाळेचे मुख्याध्यापक एस.यु. शेख यांना विचारले असता त्यांनी सांगितले की शालेय विद्यार्थ्यांच्या व्यवहारिक ज्ञानात भर पडावी त्यांना खरेदी विक्रीचा अनुभव घेता यावा शालेय पाठ्यपुस्तकच्या अभ्यासक्रमाव्यतिरिक्त त्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावे या उद्देशाने या पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी शालेय विद्यार्थी पालक,शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते.

## मोरे महाविद्यालयात एक दिवशीय निर्भय कन्या अभियान कार्यशाळा संपन्न

## प्राचार्य डॉ. एस एन शिंदे यांचे प्रतिपादन

# महिलांनी निर्भय होणे काळाची गरज



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

मविप्र समाजाचे, कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत एक दिवशीय निर्भय कन्या अभियान कार्यशाळा संपन्न झाली.

स्त्रीमध्ये सामर्थ्य असते, प्रतिभा संपन्न नेतृत्व गुण, कला गुण असतात समाज सुधारण्याचे काम स्त्री करत असते. म्हणून प्रत्येक स्त्रीने आपल्यातील गुण ओळखून आपल्या ज्ञान कक्षा कशा वाढवता येतील यावर अंतमुख होऊन स्वतःला आणखी कणखर करावे... समाजाप्रती आपल्याला काही देणे लागते. आपल्याकडे असलेल्या कौशल्य व ज्ञानातून स्त्रियांनी आजपर्यंत कुटुंबाचा व समाजाचा निश्चित विकास केलेला आहे. आज आधुनिक युगात स्पर्धा खूप वाढली असून समाजातील अनेक गोष्टीची उकल करण्यासाठी स्त्री आणखी स्वयंपूर्ण आणि सुरक्षित होणे काळाची गरज बनली आहे त्यासाठी स्त्री निर्भय होणे आणि तिला निर्भयता प्रदान करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे यांनी केले.

मविप्र समाजाचे निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक १३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत एक दिवशीय निर्भय कन्या अभियान कार्यशाळा उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. शिंदे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख वक्त्या म्हणून जिल्हा क्षयरोग नियंत्रण कक्षाच्या समन्वयक डॉ. साधना बच्छाव, निफाड पोलीस स्टेशनच्या एपीआय श्रीमती सोनल पडोळ, के टी एच एम महाविद्यालय नाशिक येथील शारीरिक क्रीडा संचालिका डॉ. मीनाक्षी गवळी व मान्यवर उपस्थित होते.

डॉ. साधना बच्छाव यांनी स्त्रियांचे शारीरिक आरोग्य, या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले स्त्रियांनी चांगलं राहण्यासाठी आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर लक्ष देणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले, स्त्रीने स्वतः च्या क्षमता ओळखून आपले शारीरिक व मानसिक आरोग्य यांची सांगड घालून जन माणसांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटावावा. त्याकरिता योग प्राणायाम शारीरिक आरोग्य याबाबत सजग राहण्याचे आव्हान केले. डॉ. मीनाक्षी गवळी यांनी निर्भय बनण्यासाठी समाजात वावरताना आपल्याला विविध प्रसंगांना सामोरे जावे लागते अन्याय अत्याचार यांना बळी न पडता त्यापासून स्वसंरक्षण कसे करावे यासाठी आपल्या प्रात्यक्षिकांमधून विद्यार्थिनींना त्यांनी मार्गदर्शन करत, मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी योग साधनेवर भर द्यावा असे आवाहन केले.

प्रास्ताविकात प्रा. प्रवीण शार्दुल यांनी कार्यशाळा आयोजनाचा उद्देश व भूमिका विशद केली. व्याख्यात्यांची ओळख डॉ. सुरेखा जाधव यांनी करून दिली, सूत्रसंचालन श्रीमती पी.सी .खापरे यांनी तर आभार श्रीमती सुनिता बोरडे यांनी मानले.

कार्यशाळेत एकूण दीडशे मुलींनी सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वीततेसाठी श्रीमती वैशाली गायकवाड, श्रीमती पी. पी. धारराव, श्रीमती व्हि.डी. जगताप, श्रीमती एम.जी. थेटे, श्रीमती सुरवाडे, श्रीमती आर्. एस. मोहोड, श्रीमती ऋचा जाधव, श्रीमती मत्सगार आणि सर्व महिला प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले तसेच चतुर्थ श्रेणी कर्मचारी सोपान मोरे, समाधान फरताळे यांनी सहकार्य केले.